## प्रकरण चौथे

## `आमच्या आयुष्यातील काही आठवणी : समाजदर्शन व वाङ्.मयीन विशेष

इ.स.१८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाली आणि महाराष्ट्रात इंग्रजी राजवट कायमची स्थिर झाली. या नव्या राजवटीमुळे आपल्या समाजामध्ये बरेच स्थित्यंतर घडून आले. पाश्चात्य संस्कृतीने नवी दृष्टी एतद्देशीयांना दिली. पाश्चात्यांचे उदार शैक्षणिक धोरण, विज्ञान-निष्ठ जीवनदृष्टी व मिशन-यांचा धर्मप्रसाराचा प्रयत्न, मुद्रण कलेचा शोध, इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव इत्यादींमुळे आपल्या समाजात शिक्षितांची नवी पिढी जन्माला आली. ही पिढी आपल्या पराभवाची

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY, SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

मीमांसा करू लागली. आपल्या समाजातील, धर्मातील दोषा लोकांच्या समोर मांडू लागली. आपल्या एकूण समाजाचे आत्मपरीक्षण होऊ लागले. याच कालखंडात स्त्रीशिक्षणालाही चालना मिळाली. स्त्रीसुधारणा म्हणजे समाज सुधारणा अशी या समाजाची धारणा बनली. यातून काही समाजसेविका निर्माण झाल्या. हळूहळू या वातावरणाचा परिणाम वाङ्मय निर्मितीवर झाला. आपले जीवनानुभव दुसऱ्यांना मार्गदर्शक ठरावेत, अशा हेतूने काही आत्मचरित्रपर लेखनही या काळात झाले. आत्मचरित्रपर लेखनात दादोबा पांडुरंग व रमाबाई रानडे यांची आत्मचरित्रे महत्त्वाची आहेत. या आत्मचरित्रांतून तत्कालीन सामाजिक, धार्मिक शैक्षणिक व आर्थिक जीवन आपल्या समोर उभे राहते. याचबरोबर त्या आत्मचरित्रात त्या त्या लेखकाचे व्यक्तिमत्वही प्रकट झालेले आहे. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीजीवनाचे दर्शन म्हणून रमाबाईंचे आत्मचरित्र अतिशय महत्त्वाचे ठरते. त्यात रमाबाईंचे व न्या.रानडे यांचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाले असून, ते कोणासही व कोणत्याही काळी आदर्शभूत ठरेल असेच आहे. प्रस्तुत प्रकरणात रमाबाईंच्या आत्मचरित्राचा अभ्यास करणे योजिले आहे.

## रमाबाईंच्या आत्मचरित्र लेखनामागची भूमिका :

आत्मचरित्र लेखनामागे त्या लेखकाची विशिष्ट अशी भूमिका असते. रमाबाईंच्या आत्मचरित्रलेखनामागेही अशी भूमिका आहे. पती-निधनानंतर उर्वरीत आयुष्य आपल्या मुलीच्या सहवासात घालवीत असताना त्या आपल्या मुलीला न्यायमूर्ती रानडे यांच्या अनेक आठवणी सांगत. या आठवणी त्यांच्या मुलीने त्यांना लिहून काढायला सांगितल्या. यातूनच हे आत्मचरित्र साकार होऊ लागले. त्यावरून रमाबाईंची आत्मचरित्र लेखनाची भूमिका आपल्या पतीचे जीवनचरित्र रेखाटण्याची आहे हे स्पष्ट होते.

गो.कृ.गोखले म्हणतात ' या पुस्तकांत रावसाहेबांच्या सार्वजनिक चरित्राचा भाग मुळीच आलेला नाही असे नाही. रावसाहेब अहर्निश देशकार्यांत इतके मग्न असत की, त्यांच्या अत्यंत खाजगी विचारांत, वर्तनांत अगर बोलण्यांत देखील सार्वजनिक कामाचा कांहीतरी संबंध आल्यावाचून राहणे शक्य नव्हते. पण या आठवणी लिहितांना वहिनीबाईंचा प्रधान हेतू सार्वजनिक गोष्टींचा उल्लेख करण्याचा नसून रावसाहेबांच्या एकंदर आयुष्यक्रमाचे चित्र महाराष्ट्रीयांपुढे नीटपणे ठेवण्यासाठी त्यांना स्वत:स असलेली व त्यांनी इतरांपासून मिळविलेली खाजगी माहिती प्रसिध्द करण्याचा आहे.' (१) गोपाळ कृष्ण देवरानीही या संदर्भात म्हटले आहे, ' रावसाहेबांच्या एकंदर आयुष्यक्रमाचे चित्र, महाराष्ट्रीयांपुढे ठेवण्यासाठी ' ह्या आठवणीं ' जन्म व त्यांना जन्मदात्या प्रत्यक्ष वहिनीसाहेब ह्यांतच या पुस्तकाचे रहस्य आहे.' (२) यावरून रमाबाईंची आत्मचरित्र लेखनामागची भूमिका स्पष्ट होते. आपल्या पतीच्या अंतरंगाचा, जीवनाचा वाचकांना परिचय करून द्यावा हा त्यांचा दृष्टिकोण आहे. त्यांची उत्कट पतिनिष्ठा आणि स्वाभिमानाची भावना यांमुळे त्यांच्या या आत्मचरित्राला कलात्मकतेचे रूप प्राप्त झाले आहे. या ' आठवणी ' मध्ये आपणाला रमाबाईंच्या पतिनिष्ठेचे आणि सेवावृत्तीचे हृदयंगम चित्र पहावयास सापडते. त्याचप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीतसुध्दा पतीने पत्नीमधील दोषांकडे न पाहता तिच्यातील गुण ओळखून, त्या गुणांचा परिपोष घेण्यासाठी तिच्या भावनांचा, विचारांचा आणि कर्तृत्वाचा पूर्ण विकास होण्यासाठी, तिच्याशी कशी सहानुभूतीची व प्रेमाची वागणूक ठेवली, याचेही चित्र या पुस्तकाद्वारे आपल्या समोर उभे राहते. त्याचप्रमाणे तत्कालीन समाजामध्ये स्त्रीच्या शिक्षणाच्याबाबतीत ज्या अडचणी येत असत, त्याचेही चित्र या पुस्तकात आलेले आहे. रमाबाईंना शिकत असताना घरातील लोकांचा कोणाकोणात्या प्रकारचा जाच सोसावा लागे, त्यांना कोणत्या प्रकारची वागणूक मिळे, हे

ही पुढील पिढीला सांगण्याचा त्यांचा उद्देश असावा असे वाटते. गो.कृ. गोखले यांनी रमाबाईंच्या आत्मचरित्रलेखनामागील भूमिकेबद्दल जे विवेचन केलेले आहे, ते अतिशय महत्त्वाचे वाटते. " हे पुस्तक वाचणाराचे मनावर ज्या कित्येक गोष्टींचा विशेष ठसा उमटल्याशिवाय राहणार नाही. त्यापैकी एकदोहांचा येथे उल्लेख करणे जरूर वाटते. पाश्चात्य समाजांत पुष्कळ कुटुंबात पतिपत्नीमध्ये पराकाष्ठेचे प्रेम आढळते. पण त्यांचा परस्पर भाव बहुतेक बरोबरीचा असतो. पण तशा त-हेचेच प्रेम उभयतांमध्ये असतां पत्नीने पतीच्या सेवेस आपणास सर्वस्वी वाहून घेऊन त्यातच धन्यता मानावी हा पूर्वेकडील स्त्रियांचा व त्यांतही हिंदुस्थानातील स्त्रियांचा विशेष मनोधर्म आहे. हा मनोधर्म हजारों वर्षांच्या संस्काराचे व परंपरेचे फळ आहे व त्याचे अत्यंत मोहक स्वरूप या पुस्तकांत दिसून येत आहे. नवे शिक्षण, नव्या कल्पना व नवी परिस्थिती यांनी विचारांस व आयुष्य-क्रमांस नवे वळण लागले असतांही वहिनीबाईंसारख्या स्त्रियांचा हा मनोधर्म आहे तसाच कायम राहतो. यापासून पुष्कळ बोध घेता येण्यासारखा आहे. दुसरी गोष्ट वाचकांच्या विशेष लक्षांत येईल, ती जी पीढी आता बहुतेक जात चालली आहे, तिला स्त्रीशिक्षण वगैरे समाजसुधारणेचे-बाबतींत ज्या अडचणी सोसाव्या लागल्या त्यासंबंधीची होय. सध्याच्या पिढीस या अडचणींची फारशी कल्पना नाही व काही काळाने त्या अजिबात नाहीशा होतील हे स्पष्ट दिसत आहे. तथापि आरंभीच्या लोकांस त्यांपासून कसा दु:सह त्रास झाला व त्यांनी तो सोसून समाजावर केवढे उपकार केले याची आठवण आपणांमधून जाऊ देणे केव्हांही इष्ट होणार नाही. ही आठवण कायम ठेवणेचे कामी प्रस्तुत ग्रंथाचा उत्कृष्ट उपयोग होईल व याहीदृष्टीने तो लिहिल्याबद्दल श्रीवहिनीबाईंचे अभिनंदन करणे जरूर आहे."[३]

आशय आणि अभिव्यक्ती :

`आमच्या आयुष्यातील काही आठवणी` हे रमाबाईंचे आत्मचरित्र म्हणजे महाराष्ट्रातील स्त्रियांना मिळालेली एक अमोल देणगीच आहे. या ग्रंथाचे रमाबाईंनी आपल्या जगद्वंद्य पतीच्या अंतरंगाचा वाचकांना परिचय करून दिला आणि त्याबरोबरच आपल्या पतीबद्दलच्या अतीव निष्ठेने, उज्वल विचाराने आणि कोमल भावनांनी तसेच सरळ, शुध्द व अकृत्रिम भाषाशैलीने वाचकाचे मन आकर्षित केले. त्याचे संपूर्ण आत्मचरित्र भावनेच्या उत्कटतेने भरलेले आहे. उत्कट पतिनिष्ठा आणि स्वार्थत्यागाची भावना हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य.

या आत्मचरित्रात न्यायमूर्ती रानडे यांच्या आयुष्यक्रमाचे चित्र रेखाटले गेले आहे आणि तेही त्यांच्या जीवनाशी अधिकाधिक समरस झालेल्या धर्मपत्नीकडून. त्यामुळे या आत्मचरित्राला भावनात्मकतेचे सौंदर्य प्राप्त झाले आहे. या आत्मचरित्रातील पहिल्या भागात रानडे घराण्याचा पूर्ववृत्तांत आला असून न्यायमूर्ती रानडे यांच्या बालपणाचे वर्णन आले आहे. बालपणी त्यांचा स्वभाव शांत, समंजस व सरळमार्गी होता. रानडे यांच्या विद्याभ्यास मुंबईत झाला,.त्यांना आपल्या वडिलांची फार भीती वाटे. ते वडिलांच्या समोर जास्त बोलत नसत व वडिलांची आज्ञा उल्लंघत नसत. माधवरावांची पहिली पत्नी वारल्यामुळे त्यांना वडिलांच्या आज्ञेस्तव दुसरे लग्न करावे लागले. याचेही वर्णन या आत्मचरित्रात आले आहे. वडील आजारी असताना त्यांची रानडे फार काळजी घेत. त्यानंतर रानडे नोकरीसाठी पुण्याला गेले. पुण्यात ते सामाजिक कार्य करीत असताना त्यांना अनेक विचित्र अनुभव आले. दयानंद सरस्वतींच्या मिरवणुकीत सामील झाल्यामुळे त्यांच्या अंगावर चिखलाचे गोळे पडले. त्यानंतर त्यांची नाशिकला

बदली झाली. इत्यादी त्यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक आयुष्यातील काही प्रसंगांचे वर्णन या आत्मचरित्रात आले आहे.

स्त्रीशिक्षणाबद्दल तत्कालीन समाजातील समजुती व तत्कालीन सामाजिक परिस्थिती याचेही चित्रण या आत्मचरित्रात पहावयास मिळते. रमाबाईंना माधवरावांनी स्वत: शिकविण्यास सुरूवात केली. त्यावेळी रमाबाईंना आपल्या सासू आणि नणंदांच्याकडून फारच जाच सोसावा लागला. त्याचप्रमाणे तत्कालीन शाळातील बक्षीस समारंभ, पंडिता रमाबाई यांची भाषणे आणि कार्य, रमाबाई रानडे यांचे सामाजिक कार्य, `आर्य महिला समाज` इत्यादी सामाजिक घटनांची माहितीही या आत्म-पर लेखनात पाहावयास मिळते.

नोकरीच्या निमित्ताने न्यायमूर्ती रानडे यांना पुणे, सातारा, करमाळा, नाशिक, मद्रास, आसाम इत्यादी ठिकाणी जावे लागते. या सर्व प्रवासाचे वर्णन रमाबाईंनी आत्मीयतेने व कलात्मकतेने केले आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, नाशिक, धुळे, जामगाव, सिमला, हरिद्वार, लाहोर, अमृतसर दिल्ली, कलकत्ता इत्यादी शहरांचे वर्णन व सिमला, महाबळेश्वर, माथेरान इत्यादी स्थलांचे वर्णनही या पुस्तकात आलेले आहे.

तत्कालीन समाजामध्ये सुरू असलेल्या सामाजिक सुधारणा, त्यातील न्यायमूर्ती रानडे व सौ.रानडे   पंत हौद चहा प्रकरण, ग्रामण्य प्रायश्चित इत्यादींचे वर्णन आलेले आहे. मुंबई येथील प्लेगाची साथ, त्या साथीचा भयंकर परिणाम, हिंदू प्लेग हॉस्पिटल, यांचे रमाबाईंने केलेले वर्णन अंत:करणाला पिळ पाडणारे आहे. अशाप्रकारे रमाबाईंनी आपल्या आत्मचरित्राद्वारे आपल्या पतीचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व चित्रित केले आहे. यातील प्रत्येक प्रसंग त्यांनी अंत:करणपूर्वक लिहिला आहे. प्रत्येक प्रसंगात आपले

अंत:करण ओतले आहे. रमाबाईंच्या आत्मचरित्राला त्यांच्या कोमल भावनेचा स्पर्श झाल्यामुळे त्यात समरसता आली आहे. न्यायमूर्ती रानडे याचे अंत:करण अत्यंत ऋजू असले तरी ते भावनेच्या आहारी जाणारे नव्हते. या आत्मचरित्रातून न्यायमूर्ती रानडे यांच्या मनाचा कोमलपणा आणि समतोल व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात वस्तुनिष्ठा व न्यायनिष्ठुरता अधिक होती. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय रमाबाईंच्या आत्मचरित्रातून येतो.

रमाबाईंच्या या आत्मचरित्रात तत्कालीन समाजजीवन आले असले तरी ते त्रोटक आहे. रमाबाईंचा उद्देश तत्कालीन समाजजीवन चित्रित करण्याचा नसून आपल्या पतीबद्दलच्या आठवणी सुखस्वार्थ सांगण्याचा आहे. न्यायमूर्ती रानडे हे सामाजिक जीवनाशी समरस झाल्यामुळे या आत्मचरित्रात काही प्रमाणात तत्कालीन सामाजिक जीवन येणे अपरिहार्य आहे. तत्कालीन जवळ जवळ सर्व सामाजिक घटना आणि प्रसंगांवर माधवरावांच्या विचाराचा प्रभाव पडला होता. त्यांचे जीवन या सामाजिक कार्यापासून अलग करणे शक्यच नव्हते. त्यादृष्टीने या पुस्तकात तत्कालीन समाजदर्शन येणे अपरिहार्य असून तसे ते आलेलेही आहे.

समाजदर्शन :

रमाबाईंच्या आत्मचरित्रामध्ये तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन घडते. याचे कारण न्या. रानडे आणि सौ. रमाबाई यांनी सामाजिक सुधारणेच्या चळवळीला स्वत:स वाहून घेतले होते. माधवरावांनी विद्यार्थीदशेपासूनच स्त्रीशिक्षण, बालविवाह निषेध, विधवा विवाहाला असलेला प्रतिबंध नाहीसा करणे, अस्पृश्यता निवारण, आपल्या धार्मिक आणि सामाजिक आचारातील दोष, दुष्ट रूढी नाहीशा करणे यांसारख्या सामाजिक सुधारणांमध्ये पुढाकार घेतला होता. इ.स.१८७१ मध्ये माधवरावांनी

`सार्वजनिक सभे` ची सूत्रे आपल्या हाती घेऊन सारा महाराष्ट्र हालवून सोडला. सौ.रमाबाई माधवरावांच्या गृहिणी झाल्यापासून ज्ञानार्जनात त्या त्यांच्या `प्रियशिष्या` ही झाल्या. सामाजिक, सार्वजनिक कार्यामध्ये आणि संसारामध्ये सचिव आणि सखी अशा दोन्ही भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी माधवरावांच्या सामाजिक सुधारणेच्या स्त्रीशिक्षण आणि स्त्रीजीवन विकासाच्या ध्येयाची यथार्थता सिध्द करून दाखविली.(४)

माधवराव आणि श्रीमती रमाबाई रानडे यांचे जीवनच अशाप्रकारे तत्कालीन समाजाशी एकरूप झाल्यामुळे त्यांच्या आत्मचरित्रात तत्कालीन समाजाचे चित्रण येणे स्वाभाविक आहे. त्यामुळे या आत्मचरित्रात तत्कालीन स्त्रीजीवन, शैक्षणिकजीवन, धार्मिक जीवन, कौटुंबिक जीवन, त्या समाजातील सोवळे ओवळे, रूढी परंपरा, या सर्वांचे चित्रण पाहावयास मिळते. त्या समाजामध्ये वरिष्ठ माणसांचा कुटुंबातील इतर लोकांच्यावर फार मोठा धाक असे. मुलाने वडिलांचे कोणतेही काम त्यांना न दुखविता करावे असा संकेत होता. वडील माणसांच्या उत्तराला प्रत्युत्तर देणे हे पाप समजले जाई. वडिलांचे विचार पटले नसले तरी त्यांच्या मताप्रमाणे वागावे लागे. न्या.रानडे यांच्या द्वितीय विवाहाची जी हकिकत रमाबाईंनी सांगितली आहे, त्याच्यावरून हे स्पष्ट होते. न्या. रानडे यांची द्वितीय विवाह करण्याची इच्छा नव्हती. आणि केलाच तर विधवेशी करावा असा त्यांचा विचार होता. पण हे विचार त्यांच्या वडिलांना मान्य नव्हते. आपण दुसरे लग्न करणार नाही असे ते वडिलांना आवर्जून सांगत होते. मला लग्न करावयाचे नाही. मी आता काही लहान नाही. मला बत्तीसावे वर्ष आहे. तेव्हा मला विचाराने राहण्यास काहीच हरकत नाही. कदाचित मी तसाच राहिल्यास पुनर्विवाह करीन अशी आपणास भीती वाटत असेल तर तो मी करणार नाही असे आपल्याला वचन देतो. याबद्दल आपल्याला काळजी नको.(५)

या काळातील महाराष्ट्रीय समाजामध्ये कर्मकांडाला फार महत्त्व होते. स्नानसंध्या , पुजाअर्चा, जपमाळा, नैवेद्य, वैश्वदेव इत्यादी कर्मकांड आटोपल्याशिवाय तत्कालीन कुटुंबातील गृहस्थ जेवायलासुध्दा बसत नसे. याशिवाय सणवार, श्राध्द, पक्ष इत्यादी धर्मकृत्ये चाललेली असत. सोवळ्या ओवळ्याचे तर नको|तितके महत्त्व होते. सोवळ्याचे वेडापायी मीठ, तेल, तूप, साखर, सावे इत्यादी पदार्थ देखील धुवून घेतले जात. रमाबाईंच्या आत्मचरित्रात या सोवळ्याचा उल्लेख आलेला आहे. अंग धुवून आल्यानंतर चटण्या, कोशिंबिरी, ताक करणे इत्यादी कामेही सोवळ्यातच करावी लागत. हे सर्व वडिलधायकांची पंगत उठे पर्यन्त करायला लागे. स्वयपाक घर, माजघर, देवघर, याशिवाय कुठेही जायचे नाही. हौदाकडे, मागील दारी किंवा माडीवर गेल्यावर पुन्हा अंघोळ करून सोवळ्यात गेले पाहिजे असा नियम होता. त्यावेळी एकत्र कुटुंबपध्दती प्रचलित होती. या कुटुंबात जुन्यारीती-प्रमाणे वडिलांची व मुलांची सतत भेट होत नसे. कारण वडिलांच्या देखत आपल्या अपत्यांना जवळ घ्यायचे नाही, त्याच्याशी बोलायचे नाही, असाही संकेत असे. त्यामुळे ही मुले आजोबा आजीच्या सान्निध्यात वाढत. लहानपणी रामायण, महाभारतातील कथा मुलांच्या मनांवर कोरल्या जात. या संदर्भात रमाबाई म्हणतात ` आम्हा भावंडापैकी कोणी मुले वडिला-जवळ कधी जावयाचे नाही. कारण मी जन्मले त्याचे आधी एक वर्षा पर्यन्त आमची आजी जिवंत होती. म्हणून तिच्या देखत ते कोणत्याच मुलाशी बोलत नसत. पण जवळ घेणे कोठले ! आजी निवर्तल्यावर मी झाले. त्यामुळे ते मला जेवावयास व निजावयास पुढे घेऊ लागले व लाड करू लागले.(६) अशाप्रकारे अपत्य प्रेमालाही आणि वात्सल्यालाही रूढीचा लगाम होता.

या समाजात ब-याच अंधश्रध्दा होत्या. मूल होण्यासाठी बायका नवस करीत. एका महासाध्वीच्या खडतर व्रताचरणामुळे रानड्यांच्या घराण्याला वंशज लाभला असा उल्लेख रमाबाईंनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे.

न्या. रानडे यांची निपणजी कृष्णाबाई यांची मुले जगत नव्हती. म्हणून त्यांनी सतत बारावर्षे अश्वत्थाला व गायीला प्रदक्षिणा घातल्या, व गोमुत्रात दशमीकरून तेच खाऊन राहिल्या. त्यांनी दुसरा आहार घेतलाच नाही. त्या अश्वत्थाजवळ असे मागणे मागत की, मला पुत्र होऊन पाळेमुळे तुझ्या सारखी खोल जावीत व विस्तारही तुझ्या सारखा मोठा होऊन त्याची बहुतांना छाया मिळावी."(७) त्यामुळे रानडे घराण्यात जे थोर पुरुष जन्माला आले ते या साध्वीच्या पुण्याइचेच फळ आहे असे रमाबाईंनी म्हटले आहे.

स्त्रीजीवन :

एकोणिसाव्या शतकातील समाजामध्ये कन्या जन्माला येणे हे पाप समजले जाई. त्यामुळे वडील माणसे आपल्या मुलीचा लवकरात लवकर विवाह करण्याची घाई असे. वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षी मुलींची लग्ने होत. नवरा- बायको हे नाते कळण्या आधीच केवळ वयाच्या दुसऱ्या तिसऱ्या वर्षी लग्ने होत, एवढेच नव्हे तर कधी कधी पाळण्यालाही बाशिंग बांधले जाई जरठकुमारी विवाहामुळे अनेक मुली बालविधवा होत. या बालविधवांची परिस्थिती बिकट असे. त्यांचे केशवपन केले जाई. त्यांचे दर्शन अशुभ मानले जाई.

विवाह करताना वराविषयी मुलीचे मत विचारात घेतले जात नसे. मुलगी पाहणे हा एक महत्त्वाचा प्रघात होता. मुलीला घरोघरी नेऊन दाखविण्याची पध्दत नव्हती. दाखविण्यासाठी मुलगी आणली आणि तिचे लग्न झाले नाहीतर तो घराण्याचा कमीपणा समजला जाई. रमाबाईंने आत्मचरित्रात याचा उल्लेख केला आहे. रमाबाईंच्या वडिलांनी माधवरावांच्या वडिलांची भेट घेऊन त्यांना सांगितले की " माझी मुलगी लग्नाची आहे. पण आपणाला माहितच आहे की आमच्या मुलीला लग्न ठरल्या खेरीज

नुसत्या पाहण्यासाठी पाठविण्याची चाल नाही. कोणी मनुष्य आमच्या गांवी मुलगी पाहण्यास पाठवा. त्यांना मुलगी पसंत पडली तर तिला तेथून हलवू. लग्नाकरिता बाहेर नेलेली मुलगी लग्न झाल्यावाचून तशी परत आली तर, आमच्या घराण्याचा तो कमीपणा होणार आहे.'(८) अशाप्रकारे काही जाचक रूढी तत्कालीन समाजामध्ये रूढ होत्या.

यासमाजामध्ये वडील माणसांसमोर वाचणे अथवा लिहिणे किंवा इंग्रजी शिकू लागणे हा वडिल माणसाचा अपमान मानला जाई. याबद्दलची हकिकत रमाबाईंनी सांगितली आहे. रमाबाई एकदा इंग्रजी अक्षरे असलेला कागद वाचताना त्यांच्या दुर्गा वन्संनी ते पाहिले व त्यांना फार राग आला. त्या ओरडून म्हणाल्या ' तुमचे हाफोस माडीवर आहे, तेथे तुम्ही वाचा की नाचा. आमचा अपमान केला तर खबरदार !'(९) अशाप्रकारे स्त्रियांनी वाचने अथवा लिहिणे हा वडिल माणसांचा अपमान समजला जात असे. शिवाय शिकलेली एक स्त्री वाचन करते, हे दुसऱ्या स्त्रीला सहन होत नसे. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या सुधारणेला खुद्द स्त्रीजातीचाच विरोध होता. रमाबाईसारख्या स्त्रिया हे सगळे सहन करीत असत. असह्य झाले तर रडणे एवढाच मार्ग त्यांच्या समोर होता. एकीकडे वडिल — बायकांचा जाच आणि दुसरीकडे पतीचा शिकण्याचा आग्रह यातून वाट काढीत त्या शिकत होत्या. स्त्रियांनी सभेत बोलणे हा त्यावेळी घोर गुन्हा समजला जाई. अशाच एका सभेच्या बोलण्यावरून त्यांच्या घरी फारच मोठे वादळ उठले होते. यासभेला त्यांच्या घरातील काही विद्यार्थी व मंडळी आली होती. त्यांनी घरी येऊन ताईसासूंना सांगितले. ' वहिनी-बाईंनी हजार दोनहजार माणसात खडखडीत इंग्रजीत वाचले. लाजल्या नाहीत किंवा घाबरल्या नाहीत'(१०) ही गोष्ट ताईसासूबाईंना अजिबात आवडली नाही. त्यांची तळपायाची आग मस्तकाला गेली. त्या म्हणू लागल्या ' दिवसेंदिवस माणसांनी अब्रू अगदी सोडून दिली. पहिल्या बायका

[illegible library stamp]

पुरुषांच्या पुढे उभ्या सुध्दा राहात नसत. मग बोलण्याची गोष्ट कशाला ? पुण्याहवाचनाला मात्र माणसांत बायकांना नव-याजवळ बसण्याचा प्रसंग येई. तेव्हा मानेला कड लागली तरी वर मान करावयास त्यांनी धीर होत नसे. त्या बायका का लाडक्या नसतात ? का त्यांच्यामध्ये प्रेम नसे ? आताचे प्रेम म्हणजे बायकोने पदराला पदर बांधून जवळ असावे. खुर्चीला खुर्ची लावून जवळ बसावे. पुरुषासारखे लिहावे. नाचावे येथवर आले. आजपर्यन्त घरातल्या घरांत ऐकत होतो. पण आजची त्यावर कडी आहे ! एवढयात हजार दोन हजार मंडळीत बायकोने इंग्रजी वाचले याची लाज कशी वाटली नाही. डोक्यावरचे पागोटे तरी राहिले काय ?` (११) न्या. रानडे यांच्या सारख्या एका सुधारकाच्या घरी ही स्थिती मग इतर घरी काय असणार हे उघड आहे. स्त्रीला सारे दु:ख निमूटपणे सहन करीत जीवन जगावे लागत होते. तरीपण समाजसुधारकांच्या प्रयत्नाला यश येऊन बायकाही सुधारक बनू लागल्या होत्या. त्यांच्या वागण्याबोलण्यात थोडासा मोकळे-पणा येऊ लागला होता.

तत्कालीन अनुभवी स्त्रियांना औषधाची माहिती होती. रमाबाई रानडे यांच्या आईला वैधकशास्त्र अवगत होते. त्यांची आई सतत कोणाला तरी औषध देण्यात गुंतलेली असे. (१२) असा उल्लेख रमाबाईंनी केला आहे.

याचवेळी पुण्यामध्ये आर्य महिला समाजाची स्थापना झाली. त्यांची हकिकत रमाबाईंनी दिली आहे. पंडिता रमाबाईंच्या प्रभावामुळे ही संस्था स्थापन झाली होती. पंडिता रमाबाई पुण्याला येऊन त्यांनी भागवतावर पुराणे सुरू केली. या संदर्भात रमाबाई रानडे म्हणतात. `या सभेत मुख्यत्वेकरून पंडिता बाईच निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने देत असत. आधिच पंडिताबाईंची वाणी अस्खलित व गोड असून विषय प्रतिपादन करण्याची शैली उत्तम. बोलत असताना श्रोत्याचे मन आपल्या

माणसाकडे आकर्षित करून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यांच्या या गुणामुळे शहरातील जुन्या व नव्या शिक्षणोच्छु विद्वानांना पंडिताबाईंचे कौतुक व अभिमान वाटू लागला व दर शनिवारच्या सभेला आपल्या घरच्या बायकांना व मुलीना ही मंडळी नेमाने पाठवू लागली.[१३] त्यांची व्याख्याने ऐकून बायका बोलत असत त्याचे वर्णन रमाबाई रानडे करतात. " पंडिता रमाबाईंनी सभा केली आहे. त्यांचा पुरुषांवर कटाक्ष आहे. पुरुषांच्या ताब्यात बायकांनी का वागावे ? ते बायकांना गुलामा-सारखे नागवितात. त्यांची पर्वा करीत नाहीत. चोवीस तास बायकांनी काबाड कष्ट करावेत. पुरुष घरी आले की त्यांना अंघोळीला पाणी उपसून द्यावे. आयते जेवायला वाढावे. आपण दमले असले तरी ते मनात न आणता नव-याचे हातपाय चेपावे. इतके करूनही काठे काही चुकले की लाथाबुक्याशी गाठ ! असे जे जुलमी पुरुष त्यांच्या ताब्यात तुम्ही न राहता मोकळ्या व्हा "[१४] पुरुषाची स्त्रीशी होणारी वागणूक अन्यायाची आहे. हेच पंडिता रमाबाई सांगत होत्या. पण त्याकाळच्या स्त्रीला हे पटत नव्हते. कारण पतीहाच परमेश्वर आहे. त्याची सेवा करणे हाच आपला धर्म इत्यादी संस्कार त्यांच्यावर लहानपणापासून झालेले असत. अशाप्रकारे तत्कालीन स्त्रीवर सर्वबाजूंनी अन्याय होत असे. सासू-नणंद यांचा तिला जाच सोसावा लागत असे. त्याचप्रमाणे आपल्या नव-याचे मन सांभाळतांना तिला अनेक प्रकारच्या यातना सहन कराव्या लागत आणि एवढे करूनही कुटुंबातील तिचे स्थान अगदीच गौण होते.

शैक्षणिक जीवन :

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला शिक्षणाबद्दल लोकांच्या मनात विशेष आस्था नव्हती. स्त्री शिक्षणाला तर जबर विरोध होता. सुशिक्षित घराण्यातील वडिल मंडळींनाही " स्त्रियांना पोथ्या-

पुराणे वाचण्याइतपण शिक्षण दिले म्हणजे पुष्कळ झाले. जास्त शिकून त्यांना काय रोजगार करावयाचा आहे असे वाटे. इंग्रजी शिक्षणाबद्दल तर एक प्रकारचा तिरस्कार या समाजामध्ये दिसून येत होता.कारण इंग्रजीत शिक्षणामुळे आपली मुले बाटली जातील अशी भीती पालकांच्या मनामध्ये होती. त्याचबरोबर स्त्रियांनी रोजगार करणे, कमीपणाचे मानले जाई. शिकलेल्या मुली उध्दट होतील, आपल्या पतीच्या व सासुसास-यांच्या आज्ञेप्रमाणे वागणार नाहीत, त्या वाममार्गाकडे वळतील अशी भीती वाटे.

अशा परिस्थितीतच पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे स्त्रियांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलू लागला. पुण्यास १८७० साला – पासून स्त्रियांसाठी सरकारी ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले. या कॉलेजमध्ये काही गतभर्तृका शिक्षण घेत असत. पण समाज त्यांच्याकडे संशयित दृष्टीने पाहात असे. पुण्यामध्ये ख्रिश्चन मिशनच्या इतर काही शाळा होत्या. परंतु त्यात मुलींना पाठविणे लोकांस पसंत नसे. इ.स.१८८३ साली रा.ब.महादेव रानडे डॉ. भांडारकर व श्री शंकर पांडुरंग पंडित यांच्या पुढाकाराने व सर विल्यम वेडरबर्न यांच्या मदतीने पुण्यात मुलींचे हायस्कूल स्थापन करण्यात आले. या हायस्कूलच्या स्थापनेची मागणी करण्यासाठी भरलेल्या नागरिकांच्या सभेत रमाबाई रानडे यांनी इंग्रजी भाषण वाचून स्त्री वर्गातर्फे हायस्कूलच्या मागणीस पाठिंबा दिला. त्या काळी ही गोष्ट लोकांत चर्चेचा विषय झाली होती. कारण मुलींना शिक्षण देऊ नये असे लोकमत होते. इ.स.१८९० साली पंच हौद मिशन मधील एका समारंभाच्यावेळी ख्रिश्चन मिशनरी स्त्रियांनी दिलेला चहा घेतल्याबद्दल माधवराव रानडे आणि सभेस गेलेले इतर सुमारे पन्नास गृहस्थ यांच्यावर शंकराचार्यांच्या आज्ञेनुसार बहि:ष्कार घालण्यात आला होता.

अशा काळात माधवरावांनी लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी रमाबाईंनी मुळाक्षरे शिकवायला सुरवात केली आणि त्यांच्याकडून मराठी भाषा, इतिहास, भूगोल, गणित इत्यादी विषयांचा अभ्यास करून घेतला. तसेच संस्कृत आणि इंग्रजी भाषेचाही अभ्यास करून घेतला. त्याचप्रमाणे आपल्या देशातील व देशाबाहेरील घडामोडी रमाबाईंना समजाव्या म्हणून, त्यांच्याकडून माधवराव वर्तमानपत्रे वाचून घेत व त्यांच्या बरोबर चर्चाही करीत. स्त्रियांनी शिकणे, सभांतून भाषण करणे, सार्वजनिक कार्यात पतीबरोबर भाग घेणे या गोष्टी त्यावेळी अगदी असाधारण होत्या. एवढेच नव्हे तर त्या गोष्टी लोकांना चमत्कारिक वाटत. ही स्थिती लक्षात घेता तत्कालीन शैक्षणिक जीवनाची कल्पना येते.

माधवराव रानडे व रमाबाई रानडे या दांपत्याचे जीवन तत्कालीन समाजाशी एकरूप झाले असल्यामुळे त्यांच्या जीवन चित्रणात तत्कालीन समाजातील अनेक बारीकसारीक घटना, वृत्तीप्रवृत्ती प्रतिबिंबित होणे अपरिहार्य आहे. स्त्री म्हणून वावरताना तिची स्त्रीकडूनच कशी हेटाळणी होत होती हे रमाबाईंच्या आत्मचरित्रावरून दिसून येते. या समाजामध्ये वडील माणसांचा धाक फार मोठा असे. त्यांच्या आज्ञेनुसार इतरांना वागावे लागे. अशाप्रकारे अनेक जुल्मी रूढी, परंपरा यांच्यामुळे तत्कालीन समाजातील स्त्रीला व सामान्य लोकांना कष्टप्रद व दु:खमय जीवन जगावे लागे. केशवपन, सती जाणे, बालविवाह, विधवापुनर्विवाहबंदी यांसारख्या अनिष्ठ रूढी या समाजात प्रचलित होत्या. जातियता, अस्पृश्यता, सोवळे ओवळे यांना फार स्थान होते. अशाप्रकारे हा समाज अनेक रूढी-परंपरांनी बरबटलेला होता. असे या आत्मचरित्रावरून दिसून येते.

रमाबाईंचे आत्मदर्शन :

आत्मचरित्र म्हणजे स्वत:च्या जीवनाची कहाणी असते. आणि

स्वत:च्या जीवनाची ही कहाणी सांगता सांगता लेखकाचे व्यक्तिमत्त्व - ही त्यातून अविष्कृत होत असते. रमाबाईंच्या आत्मचरित्रामध्ये हे आत्मदर्शन ब-याच प्रमाणात आलेले आढळून येते. अत्यंत प्रांजळ, सुविधा व पतीबद्दल अपारनिष्ठा असणारी स्त्री असे रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व आहे. वरील विरोधा सोबत अंत:करणाचा हळुवारपणाही रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाला लाभला आहे. आपल्या भावंडाबद्दल, आई, वडील, पती यांच्याबद्दल त्यांच्या अंत:करणात विशेष प्रेम आणि जिव्हाळा आहे. लहान वयातील एक आठवण सांगताना त्या म्हणतात, ` नवीन वाचलेल्या व ऐकलेल्या गोष्टींचा विसर पडतो. पण आईने सांगितलेल्या या सर्व गोष्टी अगदी कोरल्या सारख्या स्मरणात राहिल्या आहेत.` (१५) लहानपणी एकदा त्यांनी आण्णासाहेबांना साडी व बाहुल्या आणावयास सांगितलेले असते. ही गोष्ट दुस-या कुणाला माहित नाही, असे रमाबाईंना वाटते. पण अण्णांनी मात्र पत्रातून तात्यांना त्याविषयी कळविलेले असते. त्यामुळे आपण अण्णांना साडी व बाहुल्या आणावयास सांगितले हे तात्यांना कसे समजले, असा प्रश्न रमाबाईंना पडतो. तेव्हा त्या तात्यांना म्हणतात, `कधी नाही कळणार ! तू काय देव आहेस ? एक माझ्या गणपतीला ( मी रोज पूजा करीत असे तो मूर्ती) मात्र ठाऊक आहे. पण तो माझा आहे. कोणाला सांगणार नाही.`(१६) यातून त्यांचे भावकोमळ, हळवे , श्रध्दाळू आणि निरागस मन प्रकट होते.

रमाबाईंच्या ठायी पराकोटीचा सोशिकपणा होता. सासरी जाताना वडिलांनी रमाबाईंना आपल्या ` कुलीन घराण्याला शोभेल असे वाग` असे सांगितले होते. याबद्दल रमाबाईंना वडिलांनी केलेल्या उपदेशातून याची कल्पना येते. ` सोशिकपणा हा तुझा गुण झाला.

म्हणजे तू ख-या किंमतीला चढशील व आमच्या कुलात जन्म घेतल्याचे सार्थक होईल. हे माझे बोलणे लक्षात ठेव. याच्या उलट वागतेस असे ऐकले तर मी कधी फिरून तुला माहेरी आणणार नाही.' (१७) आपल्याला एखादे काम जमत नसेल किंवा आपण कोठे कमी पडत असू तर त्याचा स्पष्ट उल्लेख रमाबाई करतात. न्या.रानडयांची नाशिकला बदली झाल्यावर तेथे स्वयंपाकासाठी बाई मिळत नाही. त्यामुळे रमाबाईंची चांगलीच त्रेधा उडते. स्वयंपाक व्यवस्थित होत नाही. कधी खारट तर कधी तिखट. पण तरीसुध्दा माधवराव त्यांच्यावर रागवत नाहीत.यात्यांच्या वर्तणुकीवरून त्या उभयतांचा सोशिक, उदार आणि समंजस स्वभाव प्रकट होतो. 'ती पर्यन्त संवय नसल्यामुळे संसारासंबंधी प्रत्येककाम मला अवघड जाऊ लागले व त्यामुळे माझ्या मनाचा अगदी गोंधळ उडे, व मोईचे कामसुध्दा अशा धांदलीत बिघडून जाई. माझी ही स्थिती पाहूनच की काय पदार्थ खारट, तिखट कसेही झाले तरी स्वत: नावे म्हणून ठेवावयाची नाहीत व रागवावयाचे नाही. स्वयंपाकाची सवय नसल्यामुळे ती बिघडेल म्हणून भीतीने जी माझी धांदल उडे त्यांत कधी कधी मीठच घालण्यास विसरावयाचे व कधी कधी तर विसरून दोन वेळा घालावयाचे, तरीसुध्दा कधी स्वत: राग किंवा तिरस्कार करावयाचा नाही.' (१८) एकदा तर माधवराव त्यांना अबोल्याची शिक्षा देतात. ही शिक्षा त्यांना फार भयंकर वाटते. नव-यांनी स्त्रियांना मारहाण करण्याच्या त्या काळात अबोल्याची शिक्षा रमाबाईंच्या मनाची संवेदनशिलताच प्रकट करण्याची आहे. रमाबाई आपल्या पतीला विचारल्या शिवाय पांच रूपयापेक्षा जास्त खर्च करीत नसत. त्या उभयतांमध्ये शक्यतो कधी राग किंवा असंतोष उत्पन्न होत नसे. त्या सरळ व प्रामाणिक आहेत. त्यांना कोणा-बदलही द्वेष वाटत नाही. ज्यांनी आपल्याला साहाय्य केले अशा प्रत्येक

व्यक्तीचा त्या आदरपूर्वक उल्लेख करतात. आपल्या दोघा दीराविषयी त्या म्हणतात, "तरी माझे दोघे दीर माझ्याशी भावाप्रमाणे वागत. ते कधी कधी आपल्या शाळेतील गमती व मुलांनी केलेले कट असतील ते सांगून करमणूक करीत. इतकेच काय तर खालील मंडळी कोणी काही चहाड्या सांगत असतील तर त्यांच्याशी अगर मुख्य बायका माझ्या विरूध्द बोलत असल्या तर, माझी कड घेऊन त्यांच्याशी भांडत. असा सर्वरीतीने या दोघांचा मला पाठिंबा होता, ही त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट."(१९) आपल्याला झालेला त्रास रमाबाई पतींना कधीच सांगत नसत. सारे काही आपण स्वत: सहन करावे अशीच त्यांची वृत्ती होती. पतीला हवी असेल अशी गोष्ट करण्यास त्या कधीच चुकत नसत. जणू पती हेच त्यांचे समाधान होते. या संदर्भात त्या म्हणतात, "स्वत:ला हवी असेल तीच गोष्ट करण्यास मी कधी चुकत नसे. एक, जे माझे खऱ्या सुखाचे व समाधानाचे ठिकाण त्यांत अंतर येऊ नये व ही एक समाधानाची बाजू बळकट असेल तर घरांतील इतर कोणत्याही माणसांकडून होणारा जाच व त्रास सोसण्याला मला अधिक बळ येईल. अशी माझी पक्की समजूत होती." (२०) पुढील उताऱ्यावून त्यांच्या प्रेमळ आणि सत्वशील अंत:करणाचे दर्शन घडते. त्यातून त्यांची पतीनिष्ठाही प्रकट होते. "आम्हा उभयतांपैकी कोणीतरी दु:ख सोसले पाहिजे अशी जर परमेश्वराची इच्छा असेल तर स्वत: करिता मी काहीही सोसावे, पण माझ्याकरिता स्वत:ला कांही दु:ख होऊ नये, त्या कोवळ्या मनाला ते अगदी सहन होणार नाही. बायकांचे खरे व्रत म्हटले म्हणजे आपल्यापासून आपल्या प्रिय पतीला केव्हांही व कोणत्याही बाबतीत दु:ख होऊ नये, हीच तिची आमरणात इच्छा असावी व लहानमोठया सर्व गोष्टीत या धोरणाने तिचा प्रयत्न होत असावा. हेंच बायकांचे खरे सौभाग्य व हेंच व्रत. जिला पतीच्या अंत:करणाची चांगली

ओळख झाली आहे व जिला ज्या निस्सीम प्रेमाची किंमत कळत आहे तिला आप मेले व जग बुडाले अशा अप्पल पोट्या विचाराने समाधान कसे वाटावे असे म्हणून मी मनातल्या मनात ईश्वरचिंतन करीत स्वस्थ राहिले."(२१)
अशा प्रकारे या आत्मचरित्रातून प्रेमळ, सत्वशील, प्रामाणिक, सोशिक व सुविद्यपत्नी असे स्त्रीचे रूप आपल्या समोर उभे राहते. रमाबाईंचा स्वभाव अत्यंत कणवाळू आहे. रमाबाईंच्या ठिकाणी आपल्या पतीबद्दल अपार प्रेम आहे. त्याचप्रमाणे स्त्रिशिक्षणाबद्दल आणि स्त्रियांच्या बद्दल आत्मीयता आहे.

व्यक्तिचित्रण :

साहित्यकृतीत मानवी जीवनाला अनन्य साधारण असे महत्व आहे. कारण मनुष्य हा तिच्या केंद्रस्थानी असतो. त्यामुळे त्याच्या वैशिष्ट्य-पूर्ण स्वभावाचे दर्शन त्यातून घडत असते. पतीसहवासात वावरताना किंवा पतीनिधनानंतर सामाजिक कार्याच्या निमित्ताने रमाबाईंचा अनेक व्यक्तींशी संबंध आला. त्यांच्या सहवासातून रमाबाईंच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली आहे. अर्थात या जडणघडणीत न्या.रानडे यांचा वाटा मोठा आहे. या आत्मचरित्रातील व्यक्तिरेखा अनेक नात्यांनी एकत्र आल्या असून त्यांच्या वृत्तीप्रवृत्तीचे चित्रण रमाबाईंनी आत्मचरित्रात केले आहे. त्यात काही पुरूष आहेत तर काही स्त्रिया आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची रूपे रमाबाईंनी चित्रित केली आहेत, ते पाहणे आवश्यक आहे.

(१) न्या.महादेव रानडे :-

एकोणिसाव्या शतकातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनास रानडे यांनी नवे वळण लावण्याचा प्रयत्न केला. लोकप्रिय कार्यकर्ता म्हणून त्यांची जशी ख्याती आहे तसेच नव्या आणि जुन्या विचारांचा

समन्वय करून ते विचार समाजात रूजविणारा एक विचारवंत म्हणूनही समाज त्यांच्याकडे पाहतो. ही भरतभूमी सामाजिक, राजकीय, धार्मिक नैतिक, आर्थोगिक, शिक्षण विषयक क्षेत्रात अग्रेसर राहावी ही न्या.रानडे यांची प्रामाणिक इच्छा होती आणि त्या कार्याला त्यांनी स्वत:ला वाहून घेतले होते. न्या.रानडे यांच्या सामाजिक कार्याचे व व्यक्तिगत जीवनाचे चित्र रमाबाई निवेदनाच्या ओघात रेखाटतात.

आपला पती वशिला मानत नाही याचा रमाबाईंना मोठेपणा वाटतो. कोल्हापूरातील एक गृहस्थ कोर्टात चाललेल्या आपल्या कामासाठी न्या.रानडे यांना घरी भेटावयास येतात. न्या.रानडे यांच्या वडिलांचे ते जवळचे मित्र असतात. तरीसुध्दा रानड्यांनी आपल्या वडिलांना जे उत्तर दिलेले आहे, त्यातून त्यांची सत्यप्रियता, न्यायनिष्ठुरता आणि प्रामाणिकपणा स्पष्ट होतो. या संदर्भात आपल्या वडिलांना ते म्हणतात, ' मी येथे कामावर आलो आहे, सर्व कोल्हापूर आपले आहे. जो तो येऊन कामाबद्दल भीड घालेल असा प्रकार न झाला तर बरे. पक्षकाराचे काम घरी पाहावयाचे नाही. ऐकावयाचे नाही, असा माझा नियम आहे. तो आपण चालवावा.' (२२) कामाच्या संदर्भात सबब सांगणे, कोणतेही काम अंगाबाहेर टाकणे न्या.रानडे यांना मान्य नव्हते. आपली नोकरी आपण प्रामाणिकपणे करावी अशी त्यांची इच्छा होती. या संदर्भात रमाबाईंनी त्यांच्या तोंडी घातलेले पुढील उद्‌गार अतिशय महत्वाचे आहेत. ' जो पर्यन्त मला नोकरी करावयाची आहे तो पर्यन्त कोणतीही सबब सांगणे मला आवडत नाही. सबब सांगून विनंती करण्याची वेळ आली तर मी राजीनामा देवून मोकळा होईन. ते मला अधिक पसंत पडेल.' (२३) कर्तव्य करताना मनाची मुरड न घालता कर्तव्याशी एकरूप होणारा एक कर्तव्यदक्ष अधिकारी कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे न्या.रानडे असे त्याचे व्यक्तिमत्व रमाबाईंनी रेखाटले आहे.

समाजकारणात, राजकारणात व धर्मकारणात वावरणारे न्या.रानडे कुटुंबात मात्र कुणालाही दुखवीत नाहीत. रमाबाईंनी शिकण्यासाठी ताई सासुबाई आणि वन्स यांनी खूप विरोध केला. नाही नाही ते बोलून रमाबाईंचा अपमान केला. पण पती या नात्याने घरच्याना त्यांनी एकदाही दुखविले नाही किंवा एका शब्दानेही त्यांची समजूत काढली नाही. अशी रमाबाईंची पतीविषयी तक्रार आहे. एकदा रमाबाई इंग्लिश शब्द असलेला एक कागद वाचत असताना ताईसासूबाईंनी पाहिले. त्या तिला खूप बोलल्या. त्यामुळे संध्याकाळी रमाबाईंचा चेहरा फारच पडलेला होता. रमाबाईंचा हा सुकलेला चेहरा पाहून न्या.रानडे म्हणत ' थोडे सोसावयास शिकावे, उत्तर दिले नाही म्हणजे झाले. मी तुला कधी कांही बोलत नाही, ना ?' (२४) असे बोलून नेहमी पत्नीचीच ते समजूत काढतात. न्या.रानडे यांचे व्यक्तिमत्त्व मूळातच शांत, संयमी, सोशिक, धीरगंभीर असे आहे म्हणूनच घरातील वडील बायकांना ते बोलत नाहीत. ' मी शिकवितो म्हणून ती शिकते. तिला बोलण्याचे कारण नाही' असे आपल्या पतीने घरातील वडील बायकांना सांगावे, अशी रमाबाईंची इच्छा असते पण रानडे मात्र याविषयी एक शब्दही बोलत नाहीत याची रमाबाईंना खंत वाटते.

एका समजुतदार, मनमिळावू पतीचे चित्र रमाबाईंनी रंगविले आहे. रमाबाई पतीशी एकरूप झाल्या आहेत. समाजात मानसन्मान प्राप्त झालेल्या आपल्या पतीच्या प्रतिष्ठेला कुठेही कलंक लागणार नाही ना ? यावर त्यांचा कटाक्ष आहे. आपल्या सौभाग्याला जोपासणारी हिंदू स्त्री रमाबाईच्या रूपाने इथे प्रकट होते, तर पत्नीला समजून घेणारा पती माधवरावांच्या रूपाने पहायला मिळतो.

(२) <u>गोविंदराव</u> :

गोविंदराव हे न्या.रानडे यांचे हे वडील, म्हणजे रमाबाईंचे सासरे.

कोल्हापूरात पुष्कळ दिवस राहिल्यामुळे अनेकांशी त्यांची मैत्री आहे. माधवरावांचा आपल्या कामातील चोखपणा व नि:स्पृहता पाहून त्यांना आनंद वाटतो. गोविंदरावांच्या कडक शिस्तीचा धाक संपूर्ण घरावर आहे. गोविंदराव हे अत्यंत कर्मठ विचाराचे व परंपरावादी आहेत. त्यांना रूढ चालीरीती मोडणे मान्य नाही. विष्णूशास्त्री पंडित यांनी विधवेशी पुनर्विवाह केला असता न्या.रानडे त्यांना घरी जेवायला बोलवतात. पण ही गोष्ट गोविंदरावांना अजिबात आवडत नाही. या संदर्भात ते आपल्या पत्नीला म्हणतात, `आज तुम्ही पंक्तीत वाढायला जाऊ नका. ती मुलगीच वाढील. तुम्ही जेऊन घ्या. मला यावयाला रात्र होईल. माझी वाट पाहू नका` (२४) सुधारक विचाराच्या विष्णुशास्त्री पंडितांनी पुनर्विवाह केला हे गोविंदरावांना आवडले नाही. माधवरावांना मात्र विष्णुशास्त्री पंडितांच्या या निर्णयाचे कौतुक वाटले व म्हणून माधवरावांनी त्यांना घरी जेवायला बोलावले पण या घटनेमुळे गोविंदरावांचा क्रोध अनावर झाला. परंपरागत विचाराने वागणाऱ्या, जुनी मते सांभाळणाऱ्या गोविंदराव रानडे यांच्या कर्मठ स्वभावाचे रमाबाईंनी यथार्थ असे चित्र येथे रेखाटले आहे.

गोविंदराव आपल्या परंपरागत विचाराशी इतके चिकटून असतात की, आपल्या मुलाकडे राहणे हेही त्यांच्या स्वाभिमानी मनाला आवडत नाही. त्यांच्या हट्टी स्वभावाला तडजोड माहीत नस्ते. एकदा अपराधाची क्षमा मागण्यासाठी न्या.रानडे गोविंदरावांच्याकडे जातात. ते तासभर त्यांच्यासमोर उभे राहतात. पण काही न बोलता त्यांच्याकडे पाहून `माधवराव` एवढीच हाक गोविंदराव मारतात. न बोलता शिक्षा करण्याची त्यांची खास पध्दत त्यांच्या स्वभावातील आणखी एक विशेष येथे प्रकट करते.

पण गोविंदराव जसे कठोर आहेत तसे हळवेही आहेत. मुलग्याकडे राहणे कमीपणाचे आहे, असे वाटून गोविंदराव जेव्हा कोल्हापूरला यायला निघतात. न्या. रानडे म्हणतात, ' शेवटी करवीरास जाण्याचा बेत ठरला ना ? मला येथे ठेवून तुम्ही सर्व मंडळी जाणार ! माझी आई गेली त्याच दिवशी मी पोरका झालो '(२९) मुलाच्या या प्रश्नाने गोविंदरावांचे अंत:करण दाटून येते. ते अस्वस्थ होतात व आपला करवीरला जाण्याचा बेत रद्द करतात.

माणूस वृध्दत्वाकडे झुकला की हळवा बनतो. त्याला माणसांचा आधार हवा असतो. मन भावविवश होते. त्याला गोविंदरावदेखील अपवाद नाहीत. गोविंदराव जेव्हा आजारी पडतात तेव्हा मुलाने आपल्या सतत जवळ राहावे अशी त्यांची इच्छा असते. त्यामुळे रजा मिळविण्यासाठी न्या.रानडे पुण्याला जातात. तेव्हा माधवराव जे उद्‌गार काढतात त्यातून त्यांचे हळवे व भावकोमल मन प्रकट होते. ' माधवराव, डॉ.साहेबांनी धीर दिला आहे. पण माझा भरवसा मला वाटत नाही. परत लवकर आलात तर बरेच आहे. नाहीतर भेट होणार नाही. ती सर्व व्यवस्था तुम्ही नीट कराल अशी मला खात्री आहे, पण सर्वांची आजपर्यन्त माझ्या शिरावर असलेला बोजा आता तुमच्या शिरावर आला आहे हे लक्षात आले ना ? (३०) माधवरावांनी पुत्रधर्म पाळावा याची जाणीव गोविंदराव करून देतात. आपलाच शब्द, खरे करणारे, मुलांवर प्रेम करणारे, जितके हट्टी तितकेच हळवे असे गोविंदरावांचे व्यक्तिमत्त्व रमाबाई येथे वास्तवपूर्ण रीतीने रंगवितात.

(३) पंडिता रमाबाई :-

पंडिता रमाबाई ह्या कोकणस्थ ब्राह्मण होत्या. वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी संस्कृत भाषेवर प्रभुत्व संपादन केले. त्या संस्कृत भाषेमध्ये

बोलू व लिहू लागल्या. पंडिता रमाबाई ह्या सुधारक वृत्तीच्या होत्या. त्यांनी पुढे ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला व पुणे या ठिकाणी 'आर्य महिला समाजाची' स्थापना केली. त्यांची भाषाशैली श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारी होती. महाराष्ट्रात स्त्रीसुधारणा सुरू झाल्यानंतरच्या काळातील एका विदुषीचे चित्र रमाबाई रानडे यांनी येथे चित्रित केले आहे.

तसे पाहिले तर या आत्मचरित्रातील व्यक्तिरेखा विशेष परिणामकारक वाटत नाहीत. कारण त्यांच्या चित्रणाला थोडाच अवसर मिळाला आहे. गतजीवनातील आठवणीचे निवेदन करताना मिळेल तेवढया अवधीत या व्यक्तींची रेखाटने रमाबाई रानडे यांनी केली आहेत. व्यक्तीं-पेक्षाही त्यांच्या प्रवृत्तीचे दर्शन रमाबाईंनी नेमकेपणाने घडविले आहे. रमाबाई या नवविचाराच्या पुरस्कर्त्या असल्यामुळे सुधारकांविषयी त्यांना आस्था वाटणे स्वाभाविकच होते. त्यामुळे सुधारक व्यक्तींची रेखाचित्रे त्यांनी आस्थेने, आत्मीयतेने रेखाटावीत हे उघडच आहे.

विष्णुशास्त्री पंडित, केरोपंत नाना छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर स्वामी दयानंद सरस्वती, विठ्ठलाचे नामस्मरण करणारा सखाराम गोपाळ हरी देशमुख अशा कितीतरी तोलामोलांच्या व्यक्तींचा सहवास रमाबाईंना लाभला. त्यांच्या विषयी कृतज्ञतेची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. तीच अवस्था स्त्रीव्यक्तीरेखांच्याबाबतही आहे. पती सोबत फिरताना आणि समाजकार्य करताना अनेक स्त्रियांशी रमाबाईंचे स्नेहाचे व मैत्रीचे संबंध निर्माण झाले. द्वारकानाथ राघोबा तर्खडकरांची पत्नी 'लक्ष्मी' वयाने मोठी असूनही रमाबाईंच्या बरोबर मिळूनमिसळून राहते. डॉ.भांडारकरांची मोठी मुलगी शांताबाई आपल्या लेकी आणि सुनांना सारखाच मान देणाऱ्या आणि सतत आनंदात राहणाऱ्या अन्नपूर्णाबाई

अशा अनेक स्त्रियांच्या स्वभावाचे नेमकेपण रमाबाईंनी जाताजाता एकदोन वाक्यात रेखाटले आहे. पण हे रेखाटन स्थूल आणि त्रोटक असल्यामुळे ते वाचकाच्या मनावर त्या व्यक्तीचा ठसा फारसा उमटवीत नाही.

प्रसंगचित्रण :

रमाबाई आपल्या आत्मचरित्रातून आपले सांसारिक आणि सामाजिक जीवन रेखाटत आहेत. त्यामुळे या आत्मचरित्रातील प्रसंग हे पतीपत्नींच्या उभयतांच्या संदर्भातील असतात. अशा काही प्रसंगातून रमाबाईंनी आपल्या पतीचे व्यक्तिमत्त्व रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

लग्न होऊन रमाबाई ही ११ वर्षांची अशिक्षित मुलगी घरी आली तेव्हा तिला सुशिक्षित केले पाहिजे हे न्या.रानडे यांना जाणवून गेले. या प्रसंगाचे वर्णन करताना रमाबाई म्हणतात, 'लग्नाच्या पहिल्या रात्रीच आपुलकीने चौकशी करून मला पाटी पेन्सिल आणवून श्रीगणेशाचा पहिला सात अक्षरी घडा घालून दिला.'(३२) हा प्रसंग तसा फार मोठा व वरकरणी लक्षणीय वाटणारा नसला तरी सुधारणेला महत्त्व देणारे तत्कालीन तरुण मन माधवरावांच्या रूपाने त्यातून पाहायला मिळते. आणि सुधारणाविषयक जाणिवेने तत्कालीन तरुणांची मने कशी भारली होती याचा अनोखा प्रत्यय येतो.

नाशिक येथे झालेल्या मुलींच्या शाळेचा बक्षिस समारंभ या प्रसंगाचे चित्रण रमाबाईंनी बरेच सविस्तर केलेले आहे. त्यातून त्यांच्या मनावर हिंदुधर्माचा प्रभाव किती होता हे पण स्पष्ट होते. या कार्यक्रमात आभार मानण्याचे काम रमाबाई करतात. मिसेस कागलनबाईंना, त्यांच्या आईला व बहिणीला रमाबाई हार घालतात. पण मि.कागलनसाहेब यांना मात्र त्या हार घालीत नाहीत. एका भारतीय हिंदू स्त्रीने परक्या

पुरुषाच्या गळ्यात हार घालावा हे रमाबाईंना मान्य नाही. त्यामुळे डेप्युटी साहेबांनी सांगितलेल्या या कामाचा त्यांना राग येतो. त्या म्हणतात, ' मी त्यातील एक हार मिसेस कागल्नबाईंना पहिल्याने घालून मागावून त्यांच्या आईला व बहिणीला घालून एक हार तसाच तबकात वगळून तबक डेप्युटी पुढे सारीले. ' हा हार साहेबांना घालावयाचा ' असे डेप्युटी यांनी मला हळूच सुचविले. मी ओंगळेच साफ नाकारले व मला त्यांचा राग आला. रावसाहेब देशमुख हे माझ्याकडे पहात होते. ते आपल्याशीच हसले व एकदम उठून त्यांनी डेप्युटींच्या हातातील तबकातून हार उचलून घेऊन कागल्नसाहेबांच्या गळ्यात घातला. ............................... रात्री निजते वेळी मुद्दाम विदोदाने विचारले ' झाली का तुमची सभा नीटपणी ? पण बायकांना इतका पक्षपात कशाला हवा ? सभेची खटपट सगळी पुरुषांनीच केली. बायका आयत्या आल्या. त्या तिघांना मात्र ते हार घातलेस, पण बिचा-या कागल्नसाहेबानाच का वगळलेस '

मी म्हटले ' मी हिंदू नसते तर मलाही याचे काही वाटले नसते. डेप्युटी हे हिंदू व पोक्त असून त्यांनी हार घालण्याचे मला सुचविले. याचाच मला चमत्कार वाटला व रागही आला '

' पण तुम्ही बाजू देशमुखांनी सांभाळली ना ' त्यांची गोष्ट कशाला ? त्याचा थोरपणा कोणीकडे । ते असे कुत्सित परीक्षक नव्हत । ' यावर म्हटले की, ' डेप्युटीवर तू उगीच रागावली आहेस. त्यांचाही त्यात काही कुत्सित हेतू नसेल. त्यांनी सहज सुचविले असेल. कित्येक वेळा या गोष्टी पहिल्याने लक्षात येत नाहीत. बाकी व्यवहार कमी खरा ' (३३)

माधवराव करमाळायाला गेल्या नंतर तेथे ते आजारी पडले. त्यावेळेचा प्रसंगही रमाबाईंनी अत्यंत गंभीर व करुणामय असा चित्रित

केला आहे. त्यातून त्यांच्या कणवाळू, कोमल व भावविवश अंत:करणाची प्रचिती येते. ' माझा विश्वास आजपर्यन्त सर्वस्वी त्यांच्यावर आहे. त्यांच्यावाचून या वेळी मला दुसरे कोणी नाही, ....... वगैरे मी आपल्या मनाशी पुष्कळ बोलून रडले व त्याच आवेशांत उठून नाडी पाहिली. जवळ डॉक्टर व कारकून बसले होते. त्यांना ' मी जरा आंत जाऊन येते ' असे सांगून, ज्या देवळांत आम्ही उतरलो होतो, त्याच महादेवाच्या गाभाऱ्यांत देवासमोर जाऊन बसले. ................ ' आम्ही दोन तुझ्या दारी संकटात येऊन पडलो आहो, तुला वाटेल त्या रीतीने आम्हाला बाहेर काढ, तू सर्वांतर्यामी म्हणवितोस त्या तुला माझी करूणा आली नाही तर बाहेरच्या विहिरीला तरी खचित करूणा येऊन ती मला पोटांत घेईल. ' (३३) यातून हळवेपणामुळे असहाय्य बनलेले त्यांचे स्त्रीमन प्रकट होते व त्याचप्रमाणे पतीवरील प्रगाढ श्रध्दा ही दिसून येते. एका हिंदू स्त्रिचे मन येथे प्रकट झाले आहे.

यानंतर रमाबाईंच्या आयुष्यातील अत्यंत करूणामय प्रसंग म्हणजे माधवरावांचा अंत. हा प्रसंगही वाचकाचे अंत:करण हलविल असा चित्रित झाला आहे. त्याला रूपकात्मकतेचेही वलये आहेत. या प्रसंगाचे वर्णन करताना त्या म्हणतात, ' पण ईश्वरी इच्छा निराळीच होती । तिची कल्पनाही मला नव्हती । म्हणून अंत:करण करपून टाकणाऱ्या काळजीतही ज्या स्थितीला मी सुख म्हणून मानीत होते ते सुख पुढे पुरते चोवीस तास सुध्दा टिकले नाही । ज्या देदीप्यमान तेजोमय सौभाग्य सूर्याच्या प्रकाशात मी मोठ्या भूषणाने व खऱ्या आनंदाने एकसारखी २७ वर्षे वागत होते, ते प्रत्यक्ष सेवा घेणारे दिव्य सूर्यरूपी पाय मला अंतरल्यामुळे अत्यंत दु:खरूप निबिड अंधारांत चाचपडत राहण्याचा प्रसंग येऊन पोहचला. तो दिव्यसूर्य एकाएकी मावळून सर्वत्र निबिड काळोख पडला. शिव । शिव । किती मी भाग्यहीन । ' (३४)

अशाप्रकारे रमाबाईंनी काही प्रसंग अत्यंत करूणामय असे रंगविलेले आहेत. या आत्मचरित्रातील सर्वच घटना प्रसंगातून रमाबाई व माधवराव या उभयताचे व्यक्तिमत्त्व सहजपणे अविष्कृत होते व त्यांच्या दिव्य व पवित्र जीवनाची आपल्याला प्रचिती येते. या उभयताचे जीवन कोणाही हिंदू पती-पत्नीला आदर्शभूत ठरेल असेच आहे.

समकालीन चळवळी आणि रमाबाई रानडे :
---------------------------------

व्यक्तिगत जीवनात घडणारे अनेक प्रसंग हे तत्कालीन समाजाशीही निगडित असतात. व्यक्ति मानसावर या घटना प्रसंगाचा परिणाम होत असतो. एकोणिसावे शतक हे सामाजिक चळवळीनी भारलेले आहे. परंपरा आणि नवता याचा संघर्ष या काळात झाल्याचे दिसून येते. नव्याचे स्वागत करणारे आणि परंपरेचे समर्थन करणारे अशा दोन प्रवाहांचा संघर्ष चालू होता. तरीपण नवसमाज निर्माण करू पाहणाऱ्यांची प्रतिकुलतेवर मात होत आहे, असे चित्र या काळात दिसते. अशा त्या काळात न्या.रानडे, लोकहितवादी, दादोबा पांडुरंग, चिपळूणकर यांचे कार्य मोठे आहे. या पुरूषांच्या बरोबर पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, काशिताई कानिटकर इत्यादी स्त्रियांनीही या समाजकार्याला स्वत:ला वाहून घेतले होते. त्यात रमाबाई रानडे यांचे कार्य अतिशय महत्वाचे आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या २० वर्षांत आणि २० व्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत स्त्रीजीवनाची जी प्रगती दिसते ती घडवून आणण्यामध्ये रमाबाईंचाही वाटा आहे. रमाबाईंच्या या कार्याच्या संदर्भात न.चिं.केळकर यांनी म्हटले आहे," सूर्याच्या सान्निध्याने चंद्राचा प्रकाश उणवतो, त्याप्रमाणे न्यायमूर्तींच्या व्यापक तेजात रमाबाईंचे तेज वेगळे भासमान होत नाही .......... रमाबाईंनी

परोपकारी बुध्दीने, स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्तृत्वाने, मातृवात्सल्याने महाराष्ट्रीय समाजास ऋणी करून ठेविले आहे. "(३५)

रमाबाईंच्या ठिकाणी कुशाग्रबुध्दी, स्वभावातील सरळता, आज्ञाधारकपणा, सहनशीलता, ध्येयाशी समरस होण्याची उत्कट इच्छा, दीर्घोद्योग इत्यादी गुण होते. या सर्वांचा ठसा त्यांच्या सामाजिक कार्यावरही उमटला आहे. इ.स.१८८३ साली माधवराव रानडे, डॉ.भांडारकर व श्री शंकर पांडुरंग पंडित यांच्या पुढाकाराने सर विल्यिम वडेरबर्न यांच्या मदतीने पुण्यात मुलींचे हायस्कूल स्थापन करण्यात आले. ह्या हायस्कूलच्या स्थापनेची मागणी करण्यासाठी भरलेल्या नागरिकांच्या सभेत सौ.रमाबाईंनी इंग्रजी भाषण वाचून स्त्रीवर्गातर्फे हायस्कूलच्या मागणीस पाठिंबा दिला. १८७८ मध्ये रमाबाईंनी नाशिक येथे मुलींच्या शाळेत भाषण करून सार्वजनिक व्यासपीठावर उभे राहून भाषण करण्याचा मुहूर्त केला. १८८१ मध्ये न्या.रानडे मुंबईला असताना प्रार्थना समाजातील `आर्य महिला समाज` या सभेच्या साप्ताहिक सभांना सौ.रमाबाई, सौ.काशिबाई कानिटकर इत्यादी स्त्रिया जात व तेथे चर्चा, भाषणे करीत.

१९०८ साली रमाबाईंनी `सेवासदन` स्थापन केले. पुणे येथील स्त्रियांच्या ट्रेनिंगसाठी विद्यार्थिनींची निवड करण्याकरता नेमलेल्या कमिटीवर इ.स.१८८५ पासून माधवराव रानडे यांच्या बरोबर सौ.रमाबाईही होत्या. हुजूर पागेतील मुलींच्या हायस्कूलच्या आणि तेथील वसतिगृहाच्या नियंत्रणसमितीवरही सौ.रमाबाई महत्त्वाचे काम करीत. स्त्रियांनी शिकणे, सभांतून भाषण करणे, सार्वजनिक कार्यात पतीबरोबर भाग घेणे, ह्या गोष्टी त्या काळात अगदी असाधारण होत्या एवढेच नव्हे, तर त्या गोष्टी लोकांना चमत्कारिकही वाटत. प्रसंगी त्यांना विरोध होई, त्या टीकाविषयही बनत. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली म्हणजे सौ.रमाबाईंच्या

कार्याचे वैशिष्टय समजून येईल. सौ.रमाबाईंनी १८९३ ते १९०१ पर्यन्त मुंबई येथील प्रार्थना समाजातील आर्य महिला समाजाच्या अध्यक्षा म्हणून स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसाराचे कार्य केले आणि ' हिंदू लेडीज सोशल ॲण्ड लिटररी क्लब ही संस्था स्थापन करून त्या संस्थेच्या विद्यमाने स्त्रियांसाठी मराठी भाषा, सामान्यज्ञान, शिवणकला, इंग्रजी भाषा वगैरे विषयांच्या गृहशिक्षणाचे वर्ग सुरू केले. यामुळे मुंबई शहरातील स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि उन्नतीच्या कार्याचा त्या आधारस्तंभ झाल्या. आदर्श पत्नी आणि स्त्रीशिक्षणाच्या आणि स्त्रियांच्या कर्तृत्वविकासाच्या आद्यप्रवर्तक आणि मार्गदर्शक म्हणून सौ.रमाबाईंनी सर्वत्र लौकिक मिळविला. इ.स.१९०२ मध्ये श्री.रमाबाईंनी न्यायमूर्ती रानड्यांची धर्मपर व्याख्याने आणि उपदेश संगृहित करून ती ' धर्मपर व्याख्याने ' या नावाने पुस्तकरूपाने प्रसिध्द केली. १९०४ ते १९२४ या वीस वर्षांचा इतिहास पाहिला असता स्त्रियांच्या शिक्षणासाठी, स्त्रियांमध्ये आपल्या कर्तृत्वाबद्दल आणि त्याच अधिकाराबद्दल जागृती उत्पन्न करण्यासाठी आणि स्त्रियांच्या कर्तृत्वाच्या विकासासाठी ज्या चळवळी झाल्या त्या चळवळीच्या श्रीमती रमाबाई या प्रवर्तक आणि आधारस्तंभ होत्या. १९०८ साली सुरतयेथे व १९१२ साली मुंबई येथे आणि १९२० साली सोलापुरास भरलेल्या महिला परिषदेच्या त्या अध्यक्षा होत्या.

<u>मुंबई सेवा सदनाची स्थापना :</u>

१९०८ साली रमाबाईंनी पुढाकार घेऊन मुंबई सेवा सदनाची स्थापना केली. सेवासदन संस्थेला सरकारांत आणि लोकांत मान्यता मिळवून देण्यास लोकांनी संस्थेत आपल्या घरच्या स्त्रियांना पाठविण्यास आणि संस्थेच्या कार्याची अभिवृध्दी होऊन तिला मोठमोठ्या लोकांकडून धार्मिक मदत मिळवून देण्यात श्रीमती रमाबाईंचे चारित्र्य, कर्तृत्व, जाणत्या लोकांची त्यांच्या नेतृत्वातील श्रध्दा आणि त्यांची सरकारदरबारांतील

मान्यता या सर्वांचा उपयोग झाला. प्रथमपासून आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यन्त रमाबाई मुंबई सेवासदन संस्थेच्या अध्यक्ष होत्या.

पुणे सेवासदनाची सुरूवात :

श्रीमती रमाबाईंनी इ.स.१९०९ च्या आरंभापासून मुंबई सेवासदनाच्या पुणे येथील शाखेच्या कार्याला आरंभ केला. न्या.रानडे यांच्या दिवाण-खान्यातील या शाखेची स्थापना झाली. पुणे येथील सेवासदनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी रमाबाईंनी आपल्या शिरावर घेतली. संस्थेच्या कार्याने त्यांच्या वाड्याचा अर्ध्यापेक्षा अधिक भाग व्यापला. संस्थेच्या आद्य कार्यकर्त्या म्हणून काही वर्गांना शिकविण्याचे कामसुध्दा त्यांनी केले. संस्थेच्या स्थैर्याची, प्रगतीची आणि विकासाची अशी सर्व प्रकारची काळजी त्या वाहू लागल्या. पहिल्या वर्षी या संस्थेत साठ विद्यार्थीनींनी शिक्षण घेतले. याशिवाय फर्स्ट एड आणि रूग्ण शुश्रुषेच्या वर्गात सुमारे ३५ स्त्रिया शिकल्या. या संस्थेचा पहिला बक्षीस समारंभ ता. ८ नोव्हेंबर १९१० या दिवशी डॉ.भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्याला सुमारे २५० पुरूष मंडळी आणि ५०० स्त्रिया हजर होत्या.

लवकरच या संस्थेमार्फत स्त्रियांसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले. पुणे सेवासदन संस्थेने १९११ सालापासून काही उच्च वर्गातील स्त्रियांना ससून हॉस्पीटलमध्ये रूग्ण परिचर्येचे आणि प्रसूतिशास्त्राचे शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली. या त्यांच्या कार्यामुळे श्री.रमाबाई रानडे म्हणजेच सेवासदन असे समीकरण तयार होणे सहाजिकच होते. त्यांची भाषा सहज, सुंदर आणि शुध्द असे. त्यांच्या बोलण्यात दृढ निश्चयाचा प्रत्यय येई. परंतु त्यामध्ये मृदुता व जिव्हाळाही असे. त्यांचे विचार उगत असत. त्यामध्ये न्यायमूर्ती रानड्यांच्या विचारांची जिवंत

छाया दिसत असे. त्यांची मुद्रा नेहमी शांत, प्रसन्न व गंभीर असे. त्यांच्या मुद्रेची प्रसन्नता आणि मनाची समता संकटाच्या किंवा दु:खाच्या वेळीसुध्दा ढळल्याचे दिसून येत नसे. त्यांच्या तोंडून ति-हाइता-समोर दु:खाचा किंवा रागाचा चकार शब्दही निघत नसे. हा दैवी गुण त्यांनी न्यायमूर्तींच्या सहवासात आणि नंतर केलेल्या सहनशीलतेच्या व मनोनिग्रहाच्या तपश्चर्येचे फळ होय. त्यांनी अपशब्दाने आपली वाणी कधी विटाळली नाही. आपणास त्या न्यायमूर्तींची `सावली` म्हणत ते यथार्थ होते. याप्रमाणे न्या.रानडे यांच्या निधनानंतर चोवीस वर्षे स्त्रीशिक्षणाचे आणि स्त्री-जीवन विचाराचे व्रत अखंड चालवून श्रीमती रमाबाई वयाच्या ६२ व्या वर्षी ता. ६ एप्रिल १९२४ रोजी मृत्यू पावल्या.

रमाबाईंच्या आत्मचरित्रातील निवेदन पध्दती :

आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा दोष आपल्यावर येणार नाही याचे भान ठेवून रमाबाईंनी हे निवेदन केले आहे. त्यात प्रांजळपणा आणि त्यांच्या मनाचा नितळपणा आहे. हे निवेदन करताना त्यांनी कोणताही आडपडदा ठेवलेला नाही. न्या.रानडे यांची धर्मपत्नी म्हणून वावरताना त्यांच्या सहवासातून जे अनुभव आले, त्या अनुभवांचे, त्या आठवणींचे हे चित्रणही त्यांनी अत्यंत हळुवारपणे रेखाटले आहे. एका थोर विचारवंताची पत्नी होण्याचे भाग्य त्यांना लाभले. तत्कालीन सामाजिक जीवनात त्यांना तसा मानसन्मानही मिळाला. असे असूनही त्याविषयीचा अहंकार किंवा जज्जांची पत्नी म्हणून प्रतिष्ठेचा दर्प त्यांच्या वागण्यात, लिहिण्यात कुठेही आढळत नाही.

रमाबाई कोणत्याही प्रसंगाचे निवेदन करताना अत्यंत आत्मीयतेने करीत असतात. त्या घटनेशी वा प्रसंगाशी त्या एकरूप झालेल्या असतात.

ह्या घटना व प्रसंग त्यांच्या पतीशी संबंधित असल्यामुळे व पतीवर त्यांची प्रगाढ निष्ठा असल्यामुळे त्यांच्या निवेदनात आपलेपणा आणि आत्मीयता येते. कधी हे निवेदन भावविवशतेच्या पातळीवर जाते. त्यांत कारूण्य आणि वात्सल्य ओतप्रोत भरलेले आहे. त्याचे आत्मचरित्र म्हणजे खरोखरच एका वात्सल्याने भरलेल्या मातृमनाचे निवेदन वाटते. त्यांच्या निवेदनात शालीनता आहे तसे प्रौढत्वही आहे. पण अहंकार मात्र नाही. त्यांची निवेदन पध्दती साधी, सोपी व सरळ वाटते. आपल्या आयुष्यात जसे प्रसंग घडले तसे त्या सहजपणे सांगत जातात. त्यांचा परमेश्वरावर गाढ विश्वास आहे. त्यामुळेही त्यांच्या निवेदनाला करूण-गंभीर असे स्वरूप प्राप्त होते. या सर्व गुणांमुळे प्रस्तुत आत्मचरित्र वाचताना वाचक तन्मय होतो. रमाबाईंचे सर्व जीवन आपल्यासमोर घडत आहे असा भास होतो व या उभय पती-पत्नीबद्दल आदर आणि आत्मीयता वाटू लागते.

रमाबाईंची भाषाशैली :

आत्मचरित्राच्या दृष्टिकोणातून भाषेलाही फार महत्व आहे. कारण अनुभव वाचकाच्या अंत:करणाला भिडविण्याची ताकद लेखकाच्या भाषाशैलीमध्ये असावी लागते. रमाबाईंची भाषा ही घरगुती वळणाची आहे. जिव्हाळ्याची आहे. मित्रत्वाच्या नात्याने उपदेश करणारी आहे. त्यामुळे त्यांच्या भाषेत कोठेही राग, द्वेष, अहंकार आढळत नाही. त्यांच्या भाषेतील प्रत्येक शब्दाला वात्सल्याचा स्पर्श झाल्यामुळे ते शब्द मृदू मुलायम होऊन बाहेर पडतात. त्यांची भाषा जशी प्रौढ आहे तशीच ती गंभीरही आहे. जिव्हाळ्याने चौकशी करणारी ही रमाबाईंची भाषा आहे. आपल्या पतीविषयीच्या आदराने व प्रेमाने रमाबाईंचे अंत:करण भरलेले असल्यामुळे त्यांच्या भाषेतील आदरयुक्त व

व प्रेमभावाने भरलेले शब्द अधिक आढळतात. त्रास देणाऱ्या ताईसासूबाई किंवा वन्स यांच्याविषयी रमाबाईंच्या लेखनात बोलतानाही एकेरी वा अपमानास्पद शब्द येत नाहीत. एखाद्याविषयी तक्रार करतानाही त्या जहाल शब्द वापरत नाहीत. त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या नम्रत्वाचा व शालीनतेचा हा परिणाम असावा. रमाबाई मुळातच संघटक वृत्तीच्या असल्यामुळे त्यांच्या बोलण्यातून आपलेपणा प्रकट होत राहतो. त्यात कुठेही दुरावा, अलिप्तपणा वा फटकळपणा येत नाही. ' उत्कट पतिभक्ती, सात्विक प्रेम, उच्च भावनेला साजेल अशी रमाबाईंची भाषा आहे. ती सरळ शुध्द, अकृत्रिम आणि प्रसादपूर्ण लेखनशैलीने नटलेली आहे. '(३६) त्यांची भाषा सहज सुंदर आणि शुध्द असे. त्यांच्या बोलण्यात दृढ निश्चयाचा प्रत्यय येई. पण त्यामध्ये मृदुता व जिव्हाळा असे. माधवरावांच्या आजाराचे वर्णन करताना त्या म्हणतात, ' प्रत्येक दिवशी ही वेळ निघून गेली म्हणजे आजचा दिवस पार पडला असे माझ्या मनात येऊन मी देवाचे आभार मानी .................... आतून माझ्या मनाला धास्ती वाटे. तथापि देव आपल्या भक्तांना अत्यंत संकटात पाडून मग त्या दुर्धर संकटातून त्याची सुटका करतो. अशा ज्या त्याच्या सहज लीला आपण नेहमी वाचतो किंवा ऐकतो, त्यापैकीच ही ही वेळ नसेल कशावरून ? करमाळ्याच्या भयंकर दुखण्यातून त्याने वाचविले तो आता का उपेक्षा करील ? असे कधी होणार नाही ' (३७) खालील उताऱ्यावरून त्यांच्या या भावकोमल व करूणामय भाषेची कल्पना येईल. माधवरावांच्या आजाराने आपल्या मनाची झालेली शोकाकुल स्थिती वर्णन करताना रमाबाई म्हणतात, ' कोणाला शरण जाऊ ? कोण माझी माऊली होऊन हे संकट निवारण करील ? देवा ! माझी लाज तुला असू दे. आजपर्यन्त थोडी का जीवावरची दुखणी गेली. तेव्हा तेव्हा तूच माझ्या धावणीला धावलास व स्वत:चे वेळोवेळी रक्षण करून

ज्या मला या भाग्याच्या शिखरावर चढविलेस त्या आज मला त्या शिखरावरून खाली पायाने लोटून देशील काय ? कधी लोटणार नाहीस, असा मला भरवंसा आहे. नारायणा ! मला समजू लागल्या पासून माझ्या सर्व सुखाचा वा आनंदाचा ठेवा काय ते एवढेच ठिकाण आहे, हे तूच जाणत आहेस ते तूच सांभाळ ! एवढी भिक्षा घाल. यापेक्षा अधिक मोठे सुख मी दुसरे कशातच मानिले नाही. संसारात मला मुलेबाळे नाहीत. ही उणीव सुध्दा मला कधी भासली नाही. इतकी मी याच सहवासात संतुष्ट व गर्क आहे ................. स्वत:ची जोड मिळाल्यामुळे मला आज जी धन्यता व जे समाधान होत आहे तिला उपमा नाही. देवा, हे सारे देणारा तूच आहेस व रक्षण करणाराही तूच समर्थ आहेस "(३८)

चित्रमयता हा रमाबाईंच्या शैलीचा विशेष. या आत्म-चरित्राची भाषा जितकी साधी, सोपी सरळ आहे तितकीच ती हळवी भावविवश अशीही आहे. सोशिक मनाची करूण कहाणी व्यक्त करताना त्यांची भाषा अधिकच करूण-गंभीर बनते. तिच्या अनेक भावनेचे रंग चित्रित करण्याची ताकद आहे. ती घरगुती वळणाची आहे. त्याच प्रमाणे ही भाषा वास्तवापासून कधीही दूर जात नाही. ती वात्सल्याने अंत:करण भरलेल्या मातेची भाषा आहे. ती शुध्द, सरळ ओघवती व अकृत्रिम असल्यामुळे वाचकाचे मन आकर्षित करून घेते.

## समारोप :

"आमच्या आयुष्यातील काही आठवणी" हे एका स्त्रीने लिहिलेले आत्मचरित्र आहे. रमाबाईंनी आपल्या पतीच्या सहवासात जी २७ वर्षे घालविली त्या सहवासाचे हे चित्रण आहे. रमाबाईंच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीची जशी या आत्मचरित्रातून ओळख होते तशीच एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि २० व्या शतकाचा पूर्वार्धातील पहिली दोन

दशके, या कालखंडातील सामाजिक जीवन समजण्यासही मदत होते. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचे अनेक धागेदोरे या आत्मचरित्रातून पाहावयास मिळतात. म्हणून या आत्मचरित्राला ऐतिहासिक दृष्टया दस्तऐवजाचे रूप व महत्व प्राप्त झाले आहे.

रमाबाईंच्या या आत्मचरित्रातून केवळ ` स्व ` चे दर्शन होत नाही. तर ` स्व ` भोवती निगडित असलेल्या अनेक माणसांचेही चित्रण रमाबाईंनी या ग्रंथात केले आहे. स्त्रिया, पुरूष, नोकरचाकर, इष्टमित्र, आप्तेष्टांचे स्फुट रूपात या आत्चरित्रात वर्णन आले आहे. एकोणि-साव्या शतकातील जातीचे आणि पुरूष जातीचे हृदयंगम चित्रण या आत्मचरित्रातून पहायला मिळते. हे या आत्मचरित्राचे वाङ्.मयीनदृष्टया पतीपत्नीच्या नाजूक भावभावनांचे चित्रण रमाबाई येथे संयमशील वृत्तीने करतात. हा पण या आत्मचरित्राचा मोठा गुण म्हणावा लागेल. ` प्रांजलपणा ` हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य आहे. हे आत्मचरित्र वास्तवजीवनाचे चित्रण करणारे आहे. त्यामुळे सत्यकथनाचे मोठेच परिमाण त्याला लाभले आहे.रमाबाई स्वत:ला माधवरावांची ` सावली ` म्हणत. मला वाटते, हे आत्मचरित्र म्हणजे जणू रमाबाईंची ` सावली ` च आहे, असे म्हणावयास हरकत नाही. माधवरावांच्या म्हणजे पतीच्या जीवनाशी एकरूप झालेल्या, त्यांच्या व्यक्तित्वात आपल्या व्यक्ति-मत्वाचा लोप करून टाकणाऱ्या मनाचे म्हणजे एकोणिसाव्या शतकातील स्त्रीमनाचे प्रातिनिधिक दर्शन हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

## संदर्भ

१)	गो.कृ.गोखले, प्रस्तावना - आमच्या आयुष्यातील कांही आठवणी - रमाबाई रानडे,
प्रकाशक आर्यभूषण मुद्रणालय, पुणे
सातवी आवृत्ती १९५३.

२)	गो.कृ.देवधर - प्रस्तावना - आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी
प्रकाशक - आर्यभूषण मुद्रणालय, पुणे
सातवी आवृत्ती १९५३

३)	तत्रैव - प्रस्तावना

४)	रमाबाई रानडे आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी
प्रकाशक - आर्यभूषण मुद्रणालय,
सातवी आवृत्ती १९५३
परिशिष्ठ पृ.३

५)	रमाबाई रानडे आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी
प्रकाशक - आर्यभूषण मुद्रणालय,
सातवी आवृत्ती १९५३
पृ.२३

६)	तत्रैव	पृ.२९

७)	तत्रैव	पृ.२

८)	तत्रैव	पृ.२२

९) तत्रैव पृ.४३

१०) तत्रैव पृ.९०

११) तत्रैव पृ.९०

१२) तत्रैव पृ.१९

१३) तत्रैव पृ.८४

१४) तत्रैव पृ.८५

१५) तत्रैव पृ.२०

१६) तत्रैव पृ.२९

१७) रमाबाई रानडे 'आमच्या आयुष्यातील कांही आठवणी'
प्रकाशक - आर्यभूषण मुद्रणालय, पुणे,
सातवी आवृत्ती १९५३
पृ.४३

१८) तत्रैव पृ.५१

१९) तत्रैव पृ.७८

२०) तत्रैव पृ.८३

२१) तत्रैव पृ.२४१,४२

२२) तत्रैव पृ.१४-१५

२३) तत्रैव पृ. ६५

२४) तत्रैव पृ.४५

२५) तत्रैव पृ.९०

२६) प्रतिमा ठिपसे 'हृद्गत' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे
प्रथम आवृत्ती १९८१, पृ.३१

२७) रमाबाई रानडे 'आमच्या आयुष्यातील कांही आठवणी
आर्यभूषण मुद्रणालय, पुणे
सातवी आवृत्ती १९५३, पृ.९०

२८) तत्रैव पृ.३२

२९) तत्रैव पृ.३४

३०) तत्रैव पृ.३६

३१) तत्रैव पृ.७९

३२) तत्रैव पृ. ६२

३३) तत्रैव पृ.१४८

३४) तत्रैव पृ.२७१

३५) तत्रैव. परिशिष्ट, श्रीमती रमाबाई राने व्यक्ती आणि कार्य,
च.चिं.केळकर
केसरी ता. ३०-४-१९२४

३६) मा.श्रो.विधवास - रमाबाई रानडे, व्यक्ती आणि कार्य
पृ.२६

३७) रमाबाई रानडे - आमच्या आयुष्यातील काही आठवणी
पृ.२६९

३८) तत्रैव पृ.२६९

...